सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२४–२५/५७० दिनांक : ३०/०८/२०२४

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
**कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविणारी**
संबंधित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय :– **माहे मार्च, एप्रिल व मे २०२४ अखेर या कालावधीत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेत सहभागी विद्यार्थी, मानधन देयके व इतर माहिती भरणेबाबत.**

संदर्भ :– १. परिपत्रक क्र. ४१/२४, दि. २९/०२/२०२४.
२. या विभागाचे विविमं/२०२३–२४/२५५, दिनांक १९/०३/२०२४ चे पत्र.
३. या विभागाचे विविमं/२०२३–२४/२९७, दिनांक ०२/०४/२०२४ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये माहे मार्च, एप्रिल व मे २०२४ अखेर या कालावधीत (परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्ट्या सोडून) 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजना राबविण्याकरिता मान्यता देण्यात आलेली आहे.

विद्यार्थी विकास मंडळामार्फत **माहे मार्च, एप्रिल व मे, २०२४ या कालावधीकरिता सदर योजनेची मान्यता असलेल्या आणि या कालावधीत योजना राबविलेल्या** संबंधित सर्व महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेत **वरील कालावधीत** सहभागी विद्यार्थ्यांची माहिती, कामाचे तास, अदा केलेले मानधन व त्यासंदर्भातील इतर माहिती प्रत्येक/सर्व विद्यार्थ्यांची (पात्रता क्रमांकाच्या (Eligibility No.) मदतीने) खालील माहिती विद्यार्थी विकास मंडळाच्या लिंकवर **सोमवार दिनांक ०९ सप्टेंबर, २०२४ पर्यंत** भरणे अनिवार्य आहे.

| | | |
|---|---|---|
| **(माहे मार्च, एप्रिल व मे, २०२४ या कालावधीची विद्यापीठाची मान्यता असलेल्या महाविद्यालय/परिसंस्थांनीच माहे मार्च, एप्रिल व मे, २०२४ या कालावधीत योजनेत सहभागी विद्यार्थ्यांची माहिती भरावी.)** | | |
| **(www. unipune.ac.in – Students' Developement – BOD Online–Login – (User Name & Password) – Students Developement – Menu – K.B.P. Earn & Learn** | | |
| **तपशील** | **लिंक** | **अपलोड करावयाच्या फाईलबाबत माहिती** |
| सहभागी विद्यार्थी नावनोंदणी | Add K.B.P. Earn & Learn Students – Add New Students | प्रत्येक/सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता क्रमांकाच्या (Eligibility No.) मदतीने माहिती भरणे. |
| हजेरी, कामाचे तास, ठिकाण, स्वरूप, मानधन माहिती व कामकाजाचे फोटो | Mothe-wise Work Summary | त्या–त्या महिन्याचे एकत्रित हजेरी पत्रक, मानधन बँकेत जमा केल्याची बँक पोच (Bank O/C) व विद्यार्थी कामकाजाचे दोन फोटो व इतर माहिती भरणे व स्कॅन करून अपलोड करणे. |
| **१. माहे मार्च, एप्रिल व मे, २०२४ या कालावधीकरिता नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची नावनोंदणी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ (माहे जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२५) पुन:श्च करण्याची आवश्यकता नाही. सदर माहिती शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता लिंक करण्यात आलेली आहे.**<br>**२. प्रथम वर्ष पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन सदर योजनेत सहभागी विद्यार्थ्यांची नोंदणी पदवी/पदव्युतर पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक पात्रता क्रमांकाच्या (Eligibility No.) मदतीने करावी.** | | |

आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेत माहे मार्च एप्रिल व मे, २०२४ या कालावधीकरिता सहभागी प्रत्येक/सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन पद्धतीने वरीलप्रमाणे माहिती **काळजीपूर्वक व जबाबदारीने अचूकपणे भरणे व स्कॅन करून अपलोड** करण्याबाबत संबंधित विभागांना/शिक्षकांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**ऑनलाईन तांत्रिक अडचणी व अधिक माहितीसाठी :**
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in

**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन संपर्क :**
020-25622680/25622681



**(डॉ. अभिजीत कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ